या कार्यक्रमाची सुरुवात सन २००५-२००६ या आर्थिक वर्षापासून झाली असून पुढील ७ वर्षापर्यंत हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदरहू JNNURM ची योजना महाराष्ट्रातील बृहन्मुंबई शहर समूह, पुणे शहर समूह, नाशिक, नागपूर व नांदेड या पाच नागरी समुहांसाठी (Urban Agglomeration) व या व्यतिरिक्त राज्यातील सर्व म.न.पा. व न.पा. यांचा समावेश लहान व मध्यम शहरांचा पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रमांमध्ये करण्यात आला आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियानाअंतर्गत निधीची पुढीलप्रमाणे आहे :-

| प्रवर्ग | लोकसंख्या २००१ जनगणनेनुसार | शहर समूह | निधीची विगतवारी (%) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | निधी | | नागरीसंख्या / बँकाकडून |
| | | | केंद्र शासन | राज्य शासन | कर्ज / वित्तीय संस्था |
| अ | ४० लाखांपेक्षा जास्त | बृहन्मुंबई | ३५ | १५ | ५० |
| ब | १० ते ४० लाख | नाशिक, पुणे, नागपूर. | ५० | २० | ३० |
| क | निवडक शहरे | नांदेड | ८० | १० | १० |
| ड | UIDSSMT अंतर्गत शहरे | | ८० | १० | १० |

JNNURM तसेच UIDSSMT या योजनांतर्गत केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी वाटप करण्याबाबत मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने दिलेल्या आहेत. सदर निधी अनुदान स्वरुपात द्यावा अथवा कर्ज स्वरुपात द्यावा याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घ्यावा असे स्पष्टीकरण वेळोवेळी केंद्र शासनाद्वारे कार्यशाळेत व बैठकीत देण्यात आलेले आहे. या दोन्ही योजनांतर्गत आजपर्यंत अनुदान स्वरुपात एकूण ५२८.५६ कोटी तर कर्ज स्वरुपात ११३.९२ कोटी अशा एकूण रक्कम रुपये ६४२.४८ कोटीचे निधीचे वितरण करण्यात आलेले आहे.

सदर योजनांमध्ये निधी वितरीत करताना अनुदान व कर्ज यांचे प्रमाण काय असावे यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या योजनांचा उद्देश नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पायाभूत सुविधा निर्माण करणे, त्यांचे नुतनीकरण करणे व विस्तार करणे हा आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय स्थिती चांगली नसल्याने पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरीत करताना राज्य शासनाकडून त्यांच्यावर अतिरिक्त वित्तीय भार सोपविणे उचित ठरणार नाही. चक्रीयनिधीद्वारे निधीची वसूली होऊन निर्माण होणारा निधी योजनांच्या अखेरीस अत्यल्प असेल. या योजनांतर्गत प्रस्तावित केलेले बरेच प्रकल्प राज्य शासनाकडून प्राप्त होणारा संपूर्ण निधी अनुदान म्हणून मिळेल, अशा धरणेने प्रस्तावित केलेले आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती लक्षत घेता सदर दोन्हीही योजनांच्या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून केली जाणारी त्यांच्या हिश्श्याची पूर्ण रक्कम अनुदान म्हणून दिल्यास प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षमपणे पूर्ण करण्यास मदत होईल. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

शासन निर्णय :- (१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) व लहान व मध्यत शहरांच्या पायाभूत सोयीसुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या योजनांतर्गत यापुढे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले जाणारे केंद्र / राज्य शासनाचे अर्थसहाय्य स्थायी अनुदान स्वरुपातच वितरीत करण्यात येईल.



(२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) व लहान व मध्यत शहरांच्या पायाभूत सोयीसुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या योजनांतर्गत यापूर्वी दिलेले / राज्य शासनाचे अर्थसहाय्य स्थायी अनुदान असून कर्ज नसल्याचे मानण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. वि. कुलकर्णी,
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

---

३

नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १३ सप्टेंबर २००७

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टिपीएस-३००६/३८५/प्र.क्र.-७८/२००७/नवि-३०.- ज्याआर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र १९६६ चा ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) च्या कलम ३ चे उप-कलम (१) व (२) मधील शक्तिंचा वापर करून महाराष्ट्र शासन या अधिसूचनेद्वारे सोबतच्या "परिशिष्टात" त्याच्या हद्दी निर्देशित केलेल्या आहेत, अशा प्रदेशाची स्थापना करीत आहे आणि त्याचे नामांकन "लातूर प्रदेश" म्हणून करीत आहे.

परिशिष्ट

"लातूर प्रदेश" मध्ये संपूर्ण लातूर महसूल जिल्ह्याच्या क्षेत्राच्या समावेश असेल.

टिप:-(१)लातूर प्रदेशाच्या हद्दी दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत खालील कार्यालयांमध्ये व प्रादेशिक मंडळाची नियुक्ती झाल्यावर त्या मंडळाच्या कार्यलयात अवलोकनार्थ उपलब्ध असतील:-

(१) जिल्हाधिकारी, लातूर
(२) उप संचालक नगररचना, प्रादेशिक योजना, लातूर
(३) तहसीलदार, लातूर
(४) तहसीलदार, औसा
(५) तहसीलदार, चाकूर
(६) तहसीलदार, निलंगा
(७) तहसीलदार, उदगीर
(८) तहसीलदार, अहमदपूर
(९) तहसीलदार, शिरुर अनंतपाळ
(१०) तहसीलदार, जळकोट
(११) तहसीलदार, रेणापूर
(१२) तहसीलदार, देवनी.

(२) प्रस्तुत अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर www.urban.maharashtra.gov.in ह्या पत्त्यावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शिवाजी पाटणकर,
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai-400 032

Dated : 13th September 2007

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. TPS-3006/385/CR-78/2007/UD-30.-In execise of power conferred by sub-Section (1) and (2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as 'the said Act") the Government of Maharashtra hereby established the area in the State, the limits of which have been defined in the schedule annexed hereto, to be a Region for the purpose of the said Act, and names it "Latur Region".

**SCHEDULE**

The "Latur Region" shall comprise of the entire areas of the Revenue District Latur.

*Note*.-(1) A copy of the plan showing the boundaries of the Latur Region is available for inspection at the following offices and after the constitution of the Regional Planning Board, therefore, also at the office of the said Board :--

(1) The Collector, Latur.
(2) The Deputy Director of Town Planning, Regional Plan, Latur.
(3) The Tahsildar, Latur.
(4) The Tahsildar, Ausa.
(5) The Tahsildar, Chakur.
(6) The Tahsildar, Nilanga.
(7) The Tahsildar, Udgir.
(8) The Tahsildar, Ahmedpur.
(9) The Tahsildar, Shirur Anantpal.
(10) The Tahsildar, Jalkot.
(11) The Tahsildar, Renapur.
(12) The Tahsildar, Devni.

(2) The aforesaid Notification is available on Government Web Site @ www.urban.maharashtra.gov.in.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

**SHIVAJI PATANKAR,**
Under Secretary to Government.

---